अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या **मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील, विद्यमान विनाअनुदानित संस्थांमध्ये कार्यरत व्यावसायिकांसाठीच्या स्वतंत्र तुकडीचे अभ्यासक्रम (Separate Division for Working Professional) सुरु करण्यास व प्रवेश क्षमतेत घट करण्यास शासन मान्यता देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.मान्यता-२०२५/प्र.क्र.१७१/तांशि-४
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक: ०६ जून, २०२५.**

**संदर्भ** : संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र.२/एनजीसी/एआयसीटीई-Working Professional/४११, दि.२२.०५.२०२५.

**प्रस्तावना :** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, संचालक, तंत्रशिक्षण यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील, विद्यमान विनाअनुदानित संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून कार्यरत व्यावसायिकांसाठीच्या स्वतंत्र तुकडीचे अभ्यासक्रम (Separate Division for Working Professional) सुरु करण्यास व प्रवेश क्षमतेत घट करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून व संचालक, तंत्र शिक्षण यांच्या प्रस्तावानुसार, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील, विद्यमान विनाअनुदानित संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून **प्रपत्रात** दर्शविल्याप्रमाणे व्यावसायिकांसाठीच्या स्वतंत्र तुकडीचे अभ्यासक्रम (Separate Division for Working Professional) **सुरु करण्यास व प्रवेश क्षमतेत घट करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.**

**अटी व शर्ती:-**

१) सदर मान्यता कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

२) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि.२१ मे, १९८३ च्या शासन निर्णयातील अटींची पूर्तता करणे, संबंधित महाविद्यालय/[illegible]र बंधनकारक राहील.

TRUE COPY
Madanbhai Sura Institute of Business Management, KHED, Dist. Ratnagiri.

३) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित महाविद्यालय / संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याशी करारनामा करावा लागेल. तसेच, आवश्यक कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण यांच्या संमतीने समाधानकारकरित्या पूर्ण करावी.

४) संबंधित महाविद्यालय / संस्थेने, संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क महाविद्यालयाने आकारल्यास, संबंधित महाविद्यालय / संस्थेवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७) संबंधित महाविद्यालय / संस्थेने अभ्यासक्रम चालविण्याकरिता शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व संबंधित विद्यापीठाच्या मानकानुसार नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच, शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इ. बाबत तसेच, विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संबंधित महाविद्यालय / संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८) संबंधित महाविद्यालय / संस्थेने ग्रंथालयाकरिता आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक राहील. तसेच, विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९) रॅगिंगसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संबंधित महाविद्यालय / संस्थेवर बंधनकारक राहील.

१०) संबंधित महाविद्यालय / संस्थेने सदर अभ्यासक्रम चालविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेकरिता शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतले असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय / संस्थेवर राहील.

११) संस्थेतील संबंधित अभ्यासक्रम बंद करताना किंवा प्रवेश क्षमतेत घट करताना त्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याची व परीक्षेस बसण्याची व्यवस्था करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेने या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून न दिल्यास, संस्थेविरूध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल व शासनाकडे ठेवलेली संचित ठेव शासन जमा करण्यात येईल.

TRUE COPY
Director,
Madanbhai Sura Institute
of Business Management,
KHED, Dist. Ratnagiri.

१२) संबंधित बंद होणाऱ्या अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमानुसार देय असलेले वेतन, वेतन भरपाई व अन्य आर्थिक लाभ प्रदान करणे व त्यांचे अन्य संस्थेत समायोजन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१३) शासन निर्णय दि.२२.०२.२०१८ अन्वये विहित केलेले नोंदणी शुल्क संबंधित महाविद्यालय / संस्थेने भरणा केले नसेल, तर ते संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय यांनी संबंधित महाविद्यालय / संस्थेकडून भरणा करुन घ्यावे.

१४) कार्यरत व्यावसायिक (Working Professional) च्या स्वतंत्र तुकडीच्या अभ्यासक्रमास संस्था/महाविद्यालयाने संबंधित विद्यापीठाचे संलग्निकरण प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

१५) कार्यरत व्यावसायिक (Working Professional) तुकडीबाबत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने तसेच, शासनाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या मानकांची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे संस्थांवर/महाविद्यालयांवर बंधनकारक राहील.

१६) कार्यरत व्यावसायिक (Working Professional) च्या स्वतंत्र तुकडीचे वर्ग औद्योगिक आस्थापनांच्या वेळेव्यतिरिक्त घेण्यात यावेत.

१७) कार्यरत व्यावसायिक (Working Professional) च्या स्वतंत्र तुकडीच्या अभ्यासक्रम व परीक्षाबाबत विद्यापीठांच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

२. याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संबंधित संस्था / महाविद्यालयावर बंधनकारक राहतील.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०६०६१८३२२३३४०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT Date: 2025.06.06 18:33:19 +05'30'

(अजितकुमार थोरात)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
४) कुलसचिव, संबंधित विद्यापीठ (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५) संबंधित महाविद्यालय / संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६) निवडनस्ती/तांशि-४

TRUE COPY
of Business Management,
KHED, Dist. Ratnagiri.

प्रपत्र

Higher and Technical Education Dept. G.R.No Manyata-2025/C.R.17 I/TE-4, Dated: 06th June, 2025

List of Institute having approval for new/variation in intake of seperate division for working professional course by AICTE from 2025-26

| Sr.No. | Region | institutecode | Permanent Id | Institute Name | Institute Address | District | Institution Type | New/Existing Institute | Program | UniversityName | Level | Name of Course | Intake for Working Professional_2024 | Intake for Working Professional_2025 | Variation | Course Applied for |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Chhtrapati Sambhaji Nagar | 2508 | 1-428117711 | GRAMIN TECHNICAL AND MANAGEMENT CAMPUS NANDED | GRAMIN POLYTECHNIC VISHNUPURI NANDED | NANDED | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 60 | 0 | -60 | Closure of course |
| 2 | Chhtrapati Sambhaji Nagar | 2508 | 1-428117711 | GRAMIN TECHNICAL AND MANAGEMENT CAMPUS NANDED | GRAMIN POLYTECHNIC VISHNUPURI NANDED | NANDED | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 30 | 0 | -30 | Closure of course |
| 3 | Chhtrapati Sambhaji Nagar | 2508 | 1-428117711 | GRAMIN TECHNICAL AND MANAGEMENT CAMPUS NANDED | GRAMIN POLYTECHNIC VISHNUPURI NANDED | NANDED | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere | UNDER GRADUATE | COMPUTER SCEINCE & ENGINEERING | 0 | 30 | 30 | New Course |
| 4 | Mumbai | 3121 | 1-368728I | MADANBHAI SURA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT | AT POST TALUKA KHED , DISTRICT RATNAGIRI | RATNAGIRI | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | MANAGEMENT | Mumbai University | POST GRADUATE | MMS | 0 | 60 | 60 | New Course |
| 5 | Mumbai | 3135 | 1-240349I | MCTS RAJIV GANDHI INSTITUTE OF TECHNOLOGY, MUMBAI | JUHU-VERSOVA LINK ROAD, VERSOVA, ANDHERI (W), MUMBAI-400 053 | MUMBAI SUBURBAN | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE AND DATA SCIENCE | 0 | 30 | 30 | New Course |
| 6 | Mumbai | 3135 | 1-240349I | MCTS RAJIV GANDHI INSTITUTE OF TECHNOLOGY, MUMBAI | JUHU-VERSOVA LINK ROAD, VERSOVA, ANDHERI (W), MUMBAI-400 053 | MUMBAI SUBURBAN | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 0 | 30 | 30 | New Course |

TRUE COPY

Director,
KHED, Dist. Ratnagiri.

प्रपत्र

Higher and Technical Education Dept. G.R.No Manyata-2025/C.R.171/TE-4, Dated: 06th June, 2025

List of Institute having approval for new/variation in intake of seperate division for working professional course by AICTE from 2025-26

| Sr.No. | Region | Institutecode | Permanent Id | Institute Name | Institute Address | District | Institution Type | New/Existing Institute | Program | UniversityName | Level | Name of Course | Intake for Working Professional_2024 | Intake for Working Professional_2025 | Variation | Course Applied for |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | Mumbai | 3135 | 1-2403491 | MCTS RAJIV GANDHI INSTITUTE OF TECHNOLOGY, MUMBAI | JUHU-VERSOVA LINK ROAD, VERSOVA, ANDHERI (W), MUMBAI-400 053 | MUMBAI SUBURBAN | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University | UNDER GRADUATE | INFORMATION TECHNOLOGY | 0 | 30 | 30 | New Course |
| 8 | Mumbai | 3168 | 1-2192268 | THAKUR INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, CAREER DEVELOPMENT AND RESEARCH | SHYAMNARAYAN THAKUR MARG, THAKUR VILLAGE, KANDIVALI (E) | MUMBAI SUBURBAN | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | MCA | Mumbai University | POST GRADUATE | MCA | 0 | 60 | 60 | New Course |
| 9 | Mumbai | 3173 | 1-13003614 | NAVINCHANDRA MEHTA INSTITUTE OF TECHNOLOGY AND DEVELOPMENT | DES'S MUMBAI CAMPUS, KIRTI COLLEGE ROAD, OFF VEER SAVARKAR MARG, DADAR(W), MUMBAI -28 | MUMBAI CITY | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | MCA | Mumbai University | POST GRADUATE | MASTERS IN COMPUTER APPLICATIONS | 0 | 60 | 60 | New Course |
| 10 | Mumbai | 3182 | 1-865740I | THADOMAL SHAHANI ENGINEERING COLLEGE | P.G. KHER MARG,32ND ROAD,TPS III OFF. LINKING ROAD BANDRA(WEST) MUMBAI 400050 | MUMBAI SUBURBAN | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE AND DATA SCIENCE | 0 | 30 | 30 | New Course |
| 11 | Mumbai | 3182 | 1-865740I | THADOMAL SHAHANI ENGINEERING COLLEGE | P.G. KHER MARG,32ND ROAD,TPS III OFF. LINKING ROAD BANDRA(WEST) MUMBAI 400050 | MUMBAI SUBURBAN | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University | UNDER GRADUATE | COMPUTER ENGINEERING | 0 | 30 | 30 | New Course |
| 12 | Mumbai | 3182 | 1-865740I | THADOMAL SHAHANI ENGINEERING COLLEGE | P.G. KHER MARG,32ND ROAD,TPS III OFF. LINKING ROAD BANDRA(WEST) MUMBAI 400050 | MUMBAI SUBURBAN | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University | UNDER GRADUATE | INFORMATION TECHNOLOGY | 0 | 30 | 30 | New Course |

TRUE COPY

Madanbhai Sura Institute of Business Management, KHED, Dist. Ratnagiri.

प्रपत्र

Higher and Technical Education Dept. G.R.No.Manyata-2025/C.R.171/TE-4, Dated: 06th June, 2025

List of Institute having approval for new/variation in intake of seperate division for working professional course by AICTE from 2025-26

| Sr.No. | Region | Institutecode | Permanent Id | Institute Name | Institute Address | District | Institution Type | New/Existing Institute | Program | UniversityName | Level | Name of Course | Intake for Working Professional_2024 | Intake for Working Professional_2025 | Variation | Course Applied for |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | Mumbai | 3354 | 1-16429411 | KOHINOOR BUSINESS SCHOOL | KOHINOOR CITY, EDUCATIONAL COMPLEX, KIROL ROAD, KURLA WEST | MUMBAI CITY | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | MANAGEMENT | Mumbai University | POST GRADUATE | MMS | 0 | 30 | 30 | New Course |
| 14 | Nagpur | 4130 | 1-6931116 | CENTRAL INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT RESEARCH & DEVELOPMENT,NAGPUR | PAWANBHUMI LAYOUT,SOMALWADA AIRPORT ROAD,NAGPUR | NAGPUR | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | MANAGEMENT | Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur | POST GRADUATE | MBA | 0 | 30 | 30 | New Course |
| 15 | Nagpur | 4142 | 1-8811246 | G H RAISONI COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT, NAGPUR | 37-39/1, SHRADHA PARK, HARIGANGA, HINGANA - WADI LINK ROAD, NAGPUR-16 | NAGPUR | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur | UNDER GRADUATE | ARTIFICIAL INTELLIGENCE | 30 | 60 | 30 | EoA Only |
| 16 | Nagpur | 4142 | 1-8811246 | G H RAISONI COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT, NAGPUR | 37-39/1, SHRADHA PARK, HARIGANGA, HINGANA - WADI LINK ROAD, NAGPUR-16 | NAGPUR | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur | UNDER GRADUATE | MECHANICAL ENGINEERING | 0 | 60 | 60 | New Course |
| 17 | Nagpur | 4142 | 1-8811246 | G H RAISONI COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT, NAGPUR | 37-39/1, SHRADHA PARK, HARIGANGA, HINGANA - WADI LINK ROAD, NAGPUR-16 | NAGPUR | Private-Self Financing | Extension-Expansion-Closure | ENGINEERING AND TECHNOLOGY | Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur | UNDER GRADUATE | CIVIL ENGINEERING | 0 | 60 | 60 | New Course |

TRUE COPY

Director

Madanbhai Sura Institute of Business Management, KHED, Dist. Ratnagiri.

THORAT AJITKUMAR ARUNRAO

Digitally signed by THORAT AJITKUMAR ARUNRAO
DN: CN = THORAT AJITKUMAR ARUNRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT
Date: 2025.06.06 18:33:38 +05'30'